
# केंद्र व राज्य शासनाचे इ-गव्हर्नन्स प्रकल्प

धनश्री निगडे
आचार्य पदवी विद्यार्थीनी
विस्तार शिक्षण विभाग
व. ना. म. कृ. वि., परभणी

अनिल आडे
आचार्य पदवी विद्यार्थी
विस्तार शिक्षण विभाग
व. ना. म. कृ. वि., परभणी

योगेश एखंडे
आचार्य पदवी विद्यार्थी
विस्तार शिक्षण विभाग
डॉ. बा. सा. को. कृ. वि., दापोली

कृषि विभागामार्फत केंद्र व राज्य शासनाचे इ-गव्हर्नन्सचे विविध प्रकल्प / उपक्रम राबविले जातात. सदरच्या प्रकल्प अज्ञावालींच्या वापरासाठी आणि माहिती अद्यावत करण्यासाठी कृषि विभागात मंडळ स्तरापर्यंत लॅपटॅाप तर तालुका स्तरापर्यंत संगणक, प्रिंटर्स, स्कॅनर्स, kiosk यांचा वापर करण्यात येत असून त्यासाठी इंटरनेटची सुविधा देखील उपलब्ध आहे.




फायदे-

- एकाच ठिकाणी सर्व माहिती उपलब्ध होत असल्यामुळे वेळेची बचत होते.
- शेतकऱ्यांना ऑनलाईन तसेच एस. एम. एस. द्वारे माहिती पुरवली जात असल्याने विस्ताराच्या खर्चात बचत होते.
- इंटरनेटद्वारे कोणतीही माहिती सहज घेता येते.

कृषि विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या प्रकल्प / उपक्रमाची माहिती-

- प्रकल्प आज्ञावल्या उदा. ई-परवाना, ई-ठिबक, क्रॉपसॅप, हॉर्टसॅप, क्रॉपवॉच, ऑनलाईन एम. आय. एस. आणि पर्जन्यमापन व विश्लेषण यामुळे शेतकरी व इतर भागधारकांना (Stakeholders) महत्वपूर्ण सेवा व माहिती मिळते.
- इ-गव्हर्नन्स अंतर्गतचे प्रकल्प केंद्रीय कृषी पोर्टल व राज्य कृषि पोर्टल यामध्ये एकत्रित करण्याचे नियोजन आहे.
- इ-गव्हर्नन्स अंतर्गत एकत्रित सेवा पुरविली जाते.
- माहिती तंत्रज्ञान व इ-गव्हर्नन्सचे प्रशिक्षण- पायाभूत व उजळणी प्रशिक्षण देण्यासाठी राज्यात ८ प्रशिक्षण केंद्रे (वनामती, नागपूर + ७ रामेती) असून प्रत्येक प्रशिक्षण केंद्रात २० संगणक व इंटरनेटची सुविधा उपलब्ध आहे.

राज्यातील इ-गव्हर्नन्स प्रकल्प-

१. पर्जन्यमापन आणि विश्लेषण-

या प्रकल्पाअंतर्गत प्रत्येक महसूल मंडळात पर्जन्यमापक यंत्र बसविले असून राज्यातील २०६५ राजस्व मंडळ अधिकारी पावसाची नोंद घेऊन एसएमएसद्वारे माहिती पाठवितात. यामध्ये राज्यातील २०६५ महसूल मंडळांची पर्जन्यविषयक नोंदी तथा सरासरी व मागील वर्षाची तुलनात्मक माहिती पाहता येते. सन १९९७ पासूनची अद्यावत माहिती www.maharain.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध असून ती तुलनात्मक स्वरुपात भौगोलिक माहिती प्रणाली नकाशाद्वारे (GIS maps) राज्य, जिल्हा व तालुकानिहाय उपलब्ध आहे. विभागनिहाय राज्याचा नकाशा व मंडळ निहाय सर्व जिल्ह्यांच्या नकाशाद्वारे पावसाच्या तीव्रतेनुसार वेगवेगळ्या रंगनिर्देशकाप्रमाणे माहिती मिळते.

महारेन पोर्टलवरील माहिती स्टेट डाटा बँक पोर्टलवर (https://mahasdb.maharashtra.gov.in) सुद्धा उपलब्ध आहे.

पर्जन्यमापन व विश्लेषण या प्रणालीस Skoch Order of Merit 2014 पारितोषिक देवून गौरविण्यात आले आहे.

संकेतस्थळ- http://maharain.gov.in

२. ई-परवाना: कृषि निविष्ठा परवाना व्यवस्थापन-

बियाणे, खते व किटकनाशके या कृषि निविष्ठाची विक्री व उत्पादन करण्यासाठी लागणारा परवाना सदर प्रणालीद्वारे ऑनलाईन प्राप्त होतो. तसेच यामध्ये प्रामुख्याने परवाना व्यवस्थापन, निविष्ठा तपशिल व विक्री अहवाल याबाबत माहिती आहे. निविष्ठा व्यवस्थापन कार्यवाही अंतर्गत नमुने काढण्यासाठी - ई-इन्सपेक्टर व नमुने तपासण्यासाठी - ई-लॅब या प्रणाली विकसित करण्यात येत आहेत. राष्ट्रीय उपअभियान प्रकल्पांतर्गत राज्याची ई-परवाना प्रणाली देशभर वापरासाठी निवडण्यात आलेली आहे.

ई-परवाना प्रणालीस Skoch Order of Merit 2013 आणि 2014, PSU पारितोषिक 2014, राज्य ई-गव्हर्नन्स पारितोषिक 2013, ई महाराष्ट्र पारितोषिक 2013 आणि ई-इंडिया पारितोषिक 2012 यांनी गौरविण्यात आलेले आहे.

संकेतस्थळ- http://mahaagriiqc.gov.in/

### ३. ई-ठिबक-

राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियान योजनेअंतर्गत अनुदानाचा प्रस्ताव ऑनलाईन सादर करण्यात येतो. अनुदानाचा अर्ज, सुक्ष्मसिंचन साहित्य व विक्रेता यांची निवड करण्यासाठी ई ठिबक हा सोपा मार्ग आहे. शेतकरी अर्जाची सद्यस्थिती ऑनलाईन पाहू शकतात तसेच लाभार्थ्यींची यादी सुध्दा ऑनलाईन उपलब्ध आहे. अर्जदाराच्या अर्जाची नियमाप्रमाणे छाननी करुन अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर अदा करण्यात येते.

ई ठिबक प्रणालीस Skoch Order of Merit 2014 या पारितोषिताने गौरविण्यात आले आहे.

संकेतस्थळ- http://mahaethibak.gov.in

### ४. क्रॉप सॅप/ हॉर्टसॅप-

पिकावरील किड अथवा रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) अंतर्गत पिकाचे सर्वेक्षण करुन किड अथवा रोगांच्या प्रादुर्भावाबाबत शेतकऱ्यांना उपाय योजना व सल्ला मोबाईलवर एसएमएसद्वारे पाठविला जातो, त्यासाठी केंद्र पुरस्कृत किसान एसएमएस सेवेचा वापर केला जात आहे.

संकेतस्थळ-
http://www.ncipm.org.in/cropsap2014/login.aspx

### ५. क्रॉप वॉच-

हंगामातील पिक लागवडीखालील क्षेत्राची आठवडानिहाय ऑनलाईन माहितीसाठी ही प्रणाली वापरली जाते. यामध्ये कृषि विभागामार्फत तालुकानिहाय लागवड क्षेत्राची माहिती / आकडेवारी संकलित केली जाते. त्यानुसार जिल्हा / तालुका / विभाग / राज्यनिहाय पिकनिहाय लागवडीचे क्षेत्र, मागील वर्ष व सरासरी तुलनात्मक आकडेवारी अहवाल संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

संकेतस्थळ-
http://mahaagri.gov.in/cropwatch/asp/mlogin.asp

### ६. ऑनलाईन एम. आय. एस.-

विभागांतर्गत विविध कार्यान्वित योजनांच्या सनियंत्रणासाठी भौतिक व आर्थिक प्रगतीचे अहवाल ऑनलाईन उपलब्ध होण्यासाठी सदरची प्रणाली विकसित करण्यात आली आहे. यामध्ये क्षेत्रीय स्तरावरुन सध्याची व लाभार्थ्यांची माहिती संकलित करण्यात येते. त्यानुसार योजनानिहाय, घटकनिहाय राज्य ते तालुका अहवाल उपलब्ध होतात.

## केंद्र शासनाद्वारे विकसीत इ-गव्हर्नन्स प्रकल्प-

### १. कृषि हवामान-

यावर हवामानाचा अंदाज, प्रत्यक्ष पडलेला पाऊस व त्याची सरासरीशी तुलना याबाबतची देश, विभाग, राज्य व जिल्हानिहाय माहिती व तपशीलदर्शक नकाशे उपलब्ध आहे.

संकेतस्थळ- www.imdagrimet.gov.in

### २. डाक नेट-

शेतकरी हा केंद्रबिंदू मानून त्यास उपयुक्त अशी माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावी म्हणून केंद्र शासनाच्या शेती व शेतकरी कल्याण विभागाने ही पोर्टल सुविधा विकसित केली असून त्यामध्ये शेतकऱ्यांना उपयुक्त माहिती व विविध संकेतस्थळांच्या उदा. योजना, आयात निर्यातीसाठी, कीड रोग मुक्त रोपे / बियाणे, निविष्ठा, यांत्रिकीकरण, हवामान अंदाज अहवाल इ. लिंक उपलब्ध आहेत.

संकेतस्थळ- dacnet.nic.in

### ३. सिडनेट-

यावर पीकनिहाय / वाणनिहाय पायाभूत, प्रमाणित, सत्यप्रत बियाणे माहिती उपलब्ध आहे.

संकेतस्थळ- seednet.gov.in

### ४. ॲगमार्कनेट-

यावर बाजारपेठनिहाय कृषि मालाची आवक व दर याबाबतची माहिती उपलब्ध आहे.

संकेतस्थळ- agmarknet.nic.in

### ५. शेती व शेतकरी कल्याण मंत्रालय-

यावर केंद्र शासनाच्या कृषिविषयक योजना व शेतीविषयक धोरणे याबाबतची माहिती उपलब्ध आहे.

संकेतस्थळ- agricoop.nic.in

### ६. फार्मर पोर्टल-

या पोर्टलवर शेतकऱ्यांसाठी एकाच ठिकाणी सर्व माहिती उपलब्ध व्हावी या उद्देशाने उपरोक्त सर्व प्रकल्प व कृषि विभागातील इतर योजना एकाच ठिकाणी एकत्रितरित्या उपलब्ध केल्या आहेत.

संकेतस्थळ- www.farmer.gov.in

### ७. राष्ट्रीय कृषि ई-गव्हर्नन्स प्रकल्प (NeGPA)-

या अंतर्गत केंद्र व राज्य स्तरावरील शेतीविषयक विविध कार्यक्रम व सेवासुविधा एकत्रित करून केंद्रीय कृषि पोर्टल (CAP) व राज्य कृषि पोर्टल (SAP) मार्फत एकत्रितरीत्या उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. यामध्ये विविध माध्यमांचा वापर करुन निवडलेल्या १२ सेवा (१. रोगनाशके, खते आणि बियाणे, २. माती आरोग्य, ३. पिके, शेती यंत्रे, प्रशिक्षण आणि जी.ए.पी., ४. हवामान अंदाज, ५. किंमती, आवक, खरेदी आणि संवाद मंच, ६. निर्यात आणि आयातीसाठी इ-प्रमाणपत्र, ७. विपणन पायाभूत सुविधा, ८. देखरेख आणि मूल्यांकन योजना आणि कार्यक्रम, ९. मत्स्यपालनाची साधने, १०. सिंचन पायाभूत सुविधा, ११. दुष्काळ निवारण आणि व्यवस्थापन आणि १२. पशुधन व्यवस्थापन इ.) शेतकरी व भागधारक यांचेपर्यंत पोहचविल्या जाणार असून NIC कडून प्रत्येक सेवा उप-विभाग म्हणून विकसित केली जात आहे.

(संपर्क: +९१ ९९७५२९५८००)

★ ★ ★